# प्रसिध्दी पत्रक

पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड आस्थापनेची पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई पदासाठी लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा श्री बालाजी विदयापिठ, ५५/२-७, मुंबई बँगलोर बायपास हायवे,ताथवडे, पुणे येथे **दिनांक १०/०८/२०२४ रोजी सकाळी १०:००** वाजता घेण्यात येणार आहे. पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी निर्गमीत करणार आहेत. सदरचे प्रवेशपत्र policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन घ्यावे.

लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांकरिता सूचना खालीलप्रमाणे -

## उमेदवारांसाठी सूचना :-

१) मैदानी चाचणीच्यावेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवाराकडे असतील तरच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही. तसेच स्वतःचे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये डकविणेत आलेल्या फोटोची एक प्रत सोबत आणावी.

२) लेखी परीक्षा ९० मिनिटांची व १०० गुणांसाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.

३) उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापुर्वी किमान दोन तास अगोदर सकाळी ०८.०० वा. पोहोचणे अपेक्षित आहे. परिक्षेस येण्यास विलंब झाल्यास कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही व सदर उमेदवारांना परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश दिला जाणार नाही, तसेच त्यांना लेखी परिक्षेकरिता पुन्हा संधी दिली जाणार नाही.

४) उत्तरपत्रिका कार्बनलेस OMR प्रकारची दोन प्रतीत असेल व दुय्यम प्रत उमेदवारास त्याच्या सोबत घेऊन जाण्यास परवानगी देण्यात आली आहे.

५) उमेदवारांनी OMR Sheet वरील सुचनांचे काटकोरपणे पालन करावे. तसेच काळ्या शाईचे बॉल पॉईंट पेन उमेदवारांस पुरविणेत येतील.

६) उमेदवारांनी OMR Sheet वर स्वतःची ओळख उघड होईल असे कोणतेही चिन्ह नमुद करु नये / नाव लिहू नये. खाडाखोड अथवा पुनर्लेखन करु नये. असे आढळून आल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

७) उमेदवार कॉपी करताना आढळून आल्यास त्याच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

८) कोणीही उमेदवारांनी सॅक / बॅग अथवा किंमती वस्तू सोबत आणू नयेत त्या गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी भरती समितीची राहणार नाही याची नोंद घवी.

९) परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत परिक्षागृहाबाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

१०) परीक्षा केंद्रात मोबाईल फोन / डिजीटल वॉच / डिजीटल डायरी / मायक्रोफोन / कॅलक्युलेटर / नोट पॅड / नोटस् पुस्तके / ईअरफोन / hearing aide device इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होऊ शकतो असे साहित्य सोबत बाळगण्यास सक्त मनाई आहे, असा उमेदवार आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच कसुरदाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

११) लेखी परिक्षेचा अंतिम निकाल प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवारांना लेखी परिक्षेस प्राप्त गुणांसंदर्भात काही शंका / तक्रार असल्यास त्या संदर्भात निकालानंतर २४ तासाच्या आत लेखी निवेदन सादर करावे. २४ तासानंतर येणा-या उमेदवारांच्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

१२) उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या भूलथापांना व आमिषाला बळी पडू नये. गैरप्रकार करताना कोणी आढळून आल्यास नियंत्रण कक्ष पिंपरी चिंचवड ०२०-२७३५२५०० / ०२०-२७३५२६०० या क्रमांकावर संपर्क साधावा.

**( वसंत परदेशी, भापोसे )**
**अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड**